आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
मंगळवार दिनांक ११ फेब्रुवारी २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. महाकुंभला जाणाऱ्या भाविकांसाठी मध्य रेल्वे प्रशासना तर्फे नागपूर-दानापूर मार्गावर 12 विशेष रेल्वेगाड्या- मध्य रेल्वेचे नागपुर विभागीय व्यवस्थापक विनायक गर्ग यांची माहिती.

2. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात उमेद मॉल उभारणार, पहिल्या टप्प्यामध्ये १० मॉल उभारणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा.

3. महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नियम, २०१९ मध्ये दुरूस्ती करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता, मुख्यमंत्री असणार प्राधिकरणाचे अध्यक्ष.

4. राज्यात दिव्यांग व्यक्तींच्या कल्याण आणि सक्षमीकरणाकरिता जिल्हा वार्षिक योजनेत एक टक्का निधी राखीव ठेवण्यात येणार.

5. ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला पदक तालिकेत दुसरं स्थान.

<u>कुंभमेळा रेल्वे</u>

महाकुंभ दरम्यान स्नान करण्यासाठी प्रयागराज येथे मोठ्या प्रमाणात भाविक जात आहेत. त्यांचा प्रवास सुरळीत आणि सुखकर व्हावा यासाठी मध्य रेल्वे प्रशासना तर्फे नागपूर-दानापूर-नागपूर मार्गावर 12 विशेष रेल्वेगाड्या चालविण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मध्य रेल्वेचे नागपुर विभागीय व्यवस्थापक विनायक गर्ग यांनी दिली. आता पुन्हा प्रवाशांची गर्दी लक्षात घेता 26 फेब्रुवारी पर्यंत विशेष नियोजन करण्यात आले आहे. रेल्वे गाडीत आरक्षित डब्ब्यातून विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांमुळे तिकीट काढून प्रवास करीत असलेल्या प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. यावर मात करण्यासाठी आता मध्य रेल्वे तर्फे आजपासून कुंभमेळा विशेष गाड्यांमध्ये विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. अशी माहिती देखील गर्ग यांनी दिली आहे. 14 जानेवारी पासून आतापर्यंत नागपुर रेल्वे स्थानकातून जवळपास साडे आठ लाख प्रवाशांनी प्रवास केला असून 26 फेब्रुवारी पर्यंत ही संख्या दुप्पट होणार असल्याचंही सांगण्यात आले आहे..रविवारी प्रयागराज येथून 330 रेल्वेगाड्या सोडण्यात आल्या होत्या. तर सोमवारी 191 रेल्वेगाड्या विविध मार्गावर सोडण्यात आल्यामुळे प्रवाशांनी दिलासा व्यक्त केला आहे. मध्य रेल्वेचे नागपुर विभागीय व्यवस्थापक, विनायक गर्ग म्हणाले की....

*कुंभ में रेलवे की तरफ से पैसेंजर्स के लिए विशेष व्यवस्था की गई है और वहाँ पे रेलवे का मैप मार्क जो है तीन चार डिवीजन का लगा हुआ है और सभी आठों स्टेशनों पे प्रयागराज के जो मेला क्षेत्र में आठ स्टेशन्स थे उसकी व्यवस्था की गई है। 12 ट्रेनें हम लोगों ने यहाँ से वो नागपुर से दानापुर और दानापुर से नागपुर स्पेशल हम लोग स्पेशल ड्राइव चलाएंगे जिससे की जो है की अगर आरक्षित कोच उसमें अगर कोई भी अनोथोराइज़्ड टिकट पैसेंजर्स जाता है तो उसको हम लोग उसको बंद करवा देंगे।*

दरम्यान, प्रयागराज इथं सुरू असलेल्या कुंभमेळयाला जाणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी मध्य रेल्वे १६ गाड्या चालवत असून, या सर्व स्थानकांवरची परिस्थिती सुरळीत आहे. यासंदर्भात कोणत्याही अफवांवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये, असं आवाहन मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्नील नीला यांनी केलं आहे. राज्यातून दररोज सुमारे २० विशेष आणि नियमित गाड्या प्रयागराज आणि त्या भागासाठी चालवल्या जात आहेत. पश्चिम रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक पंकज सिंह यांनीही नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवायचं आवाहन केलं आहे. भाविकांच्या समस्या सोडवण्यासाठी विविध रेल्वेस्थानकांवर मदत केंद्रंही स्थापन केल्याची माहिती त्यांनी दिली.

एआय ॲक्शन समिट

पॅरिसमधील एआय ॲक्शन समिटमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एआयच्या परिवर्तनकारी प्रभावावर प्रकाश टाकला आणि त्याला "या शतकात मानवतेसाठी संहिता लिहिणारी" एक परिभाषित शक्ती असे म्हटले आहे. दरम्यान एआय चा वापर सावधगिरीने करावा असे ते, म्हणाले....

*While the positive potential of AI is absolutely amazing, there are many vices that we need to think carefully about. That is why I'm grateful to my friend President Macron for hosting this summit.*

आरोग्यसेवा, शिक्षण आणि शेतीमध्ये क्रांती घडवून लाखो लोकांचे जीवन सुधारण्याची एआयची क्षमता पंतप्रधान मोदींनी यावेळी अधोरेखित केली.

'महालक्ष्मी सरस'

'महालक्ष्मी सरस' हा अत्यंत लोकप्रिय उपक्रम झाला आहे. राज्यभरातील बचत गटांना हक्काचं विक्रीच साधन उपलब्ध व्हाव यासाठी प्रायोगिक तत्त्वावर दहा जिल्ह्यात दहा मॉल तयार करणार. टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्यात मॉल तयार करणार आहोत. त्याच बरोबर राज्यात आगामी कालावधीत एक कोटी लखपती दीदी करण्याचा संकल्प आहे. सध्या राज्यात १८ लाख लखपती दीदी असून मार्चपर्यंत पंचवीस लाख लखपती दीदी करणार आहोत अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.....

*विभागाला निर्देश देऊन आणि अर्थमंत्र्यांना सांगून या वेळच्या अर्थसंकल्पामधे या उमेद मॉल करता आपण घोषणा करून त्या करता निधी ठेवू आणि या संदर्भात सचिव महोदय प्रधान सचिव महोदय आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये असा हा निर्णय करा की पहिल्या एका वर्षात किमान 10 जिल्ह्यांमध्ये तरी मॉलची सुरुवात झाली पाहिजे.*

बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा, मुंबई येथे ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या वतीने ११ ते २३ फेब्रुवारी दरम्यान सुरू राहणाऱ्या “महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन – २०२५” चे उद्धघाटन प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले की, बचत गटांमार्फत तयार केलेल्या वस्तू ह्या खाजगी कंपनीच्या मालापेक्षा अत्यंत उत्कृष्ट दर्जाची असून, ती अत्यंत माफक दरात उपलब्ध होतात. उमेद च्या माध्यमातून ६० लाख पेक्षा अधिक कुटुंब आर्थिक प्रगती करत आहेत.या माध्यमातून बचत गटातील महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'लखपती दीदी' ही योजना आणली आहे.

प्रसारभारती मुख्य कार्यकारी अधिकारी बैठक

प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी आज मुंबईत दूरदर्शन आणि आकाशवाणीच्या कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी सर्व विभागांची माहिती जाणून घेतली आणि अधिकाधिक लोकाभिमुख होण्यासाठी विभागप्रमुखांना सूचना दिल्या. मे महिन्यात १ ते ४ तारखेदरम्यान होणाऱ्या waves परिषदेच्या तयारीचाही आढावा त्यांनी यावेळी घेतला.

## नक्षल तळ उद्ध्वस्त

गडचिरोली तालुक्यातील दिरंगी आणि फुलणार गावांच्या जंगलात नक्षल्यांचे शिबिर पोलिसांनी उदध्वस्त केले. यावेळी पोलिसांशी झालेल्या चकमकीत एक जवान जखमी झाला असून, त्याला हेलिकॉप्टरने नागपूरला हलविण्यात आले आहे.दिरंगी आणि फुलणार गावांच्या जंगलात नक्षल्यांनी छावणी उभारल्याची माहिती मिळाल्यानंतर अहेरीचे अतिरिक्त पोलिस अधीक्षक एम.रमेश आणि श्रेणिक लोढा यांच्या नेतृत्वात सी-६० पथकाच्या १८ आणि जलद प्रतिसाद पथकाच्या २ तुकड्या त्या भागात काल रवाना करण्यात आल्या.

## महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन

महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नियम, २०१९ मध्ये दुरूस्ती करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयानुसार प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून मुख्यमंत्री, समितीचे सदस्य मंत्री आणि अशासकीय सदस्य यांचे नामनिर्देशन करतील. महाराष्ट्र आपत्ती व्यवस्थापन नियम, २०१९ च्या नियम ३ मध्ये राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची रचना निश्चित करण्यात आली आहे. ही रचना सुधारित करण्यास मान्यता देण्यात आली. या रचनेनुसार राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामध्ये अध्यक्ष आणि नऊ सदस्य असतील. त्यामध्ये मुख्यमंत्री हे पदसिद्ध अध्यक्ष, उपमुख्यमंत्री पदसिद्ध सदस्य असतील. तर अन्य पदसिद्ध सदस्य पदाकरिता मुख्यमंत्री प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून, इतर मंत्र्यांना नामनिर्देशित करतील. तसेच अध्यक्ष आपत्ती जोखीम कमी करण्याचे ज्ञान आणि अनुभव असलेल्या व्यक्तिंना अशासकीय सदस्य म्हणून नामनिर्देशित करतील. याशिवाय राज्य कार्यकारी समितीचे अध्यक्ष पदसिद्ध सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा या समितीत समावेश राहील.

## दिव्यांग निधी राखीव

येत्या आर्थिक वर्षापासून दिव्यांग व्यक्तींच्या कल्याण आणि सक्षमीकरणाकरता जिल्हा वार्षिक योजनेतून एक टक्का निधी राखीव ठेवण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. यासंदर्भातला शासन आदेश काल जारी झाला. या निधीचा योग्य विनियोग होण्यासाठी सुस्पष्ट आदेश लवकरच नियोजन विभाग, वित्त विभागाच्या मान्यतेने दिव्यांग कल्याण विभाग निर्गमित करेल, असंही त्यांनी सांगितलं.

<u>बारावीची परीक्षा</u>

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीनं घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षेला आजपासून सुरुवात झाली. या परीक्षेसाठी १५ लाख पाच हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असल्याची माहिती मंडळानं दिली आहे. राज्यभरातल्या तीन हजार ३७३ मुख्य केंद्रावर परीक्षा होत आहे. परीक्षा काळात संभाव्य गैरप्रकारांना आळा बसावा, या दृष्टीने मंडळानं २७१ भरारी पथकांची नेमणूक केली आहे.

<u>प्राचार्य रा.रं.बोराडे निधन</u>

ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा.रं.बोराडे यांचं आज छत्रपती संभाजीनगर इथं वृद्धापकाळाने निधन झालं, ते ८५ वर्षांचे होते.त्यांच्यावर गेल्या काही दिवसांपासून एमजीएम रुग्णालयात उपचार सुरु होते. बोराडे यांच्या पार्थिव देहावर आज संध्याकाळी छत्रपती संभाजीनगर इथं अंत्यसंस्कार होणार आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी बोराडे यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे.

<u>राष्ट्रीय क्रीडा</u>

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने पदक तालिकेत दुसरं स्थान पटकावलं आहे. महाराष्ट्राकडे सध्या सर्वाधिक १२९ पदकं असून यात ३३ सुवर्ण,४८ रौप्य आणि ४८ कांस्य पदकांचा समावेश आहे. सेनादलं४९ सुवर्ण पदकांसह पहिल्या स्थानावर असून कर्नाटक ३२ सुवर्णपदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

******